Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - V MAY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा चिकित्सक अभ्यास

संशोधक
**ज्योत्स्ना भागवतराव गव्हाणे**
शैक्षणिक संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
**डॉ बाबासाहेब मनोहर गोरे**
प्राचार्य, जनविकास महाविद्यालय,
बनसारोळा,ता.केज, जिल्हा बीड

**प्रस्तावना:**

शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज आहे.शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या सर्व स्तरापैकी महत्त्वपूर्ण स्तर म्हणजे प्राथमिक शिक्षण हा संपूर्ण शिक्षण प्रक्रियेचा पाया मानला जातो.म्हणूनच याला मूलभूत शिक्षण असेही म्हणतात.प्राथमिक स्तरावरील मुलांचा वयोगट हा 7 ते 14 वर्षाचा असतो. लातूर जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी 2002-2003 पासून सुरू झालेली आहे.विविध उपक्रम केंद्र व राज्य सरकारने नेमलेल्या आराखड्यानुसार राबविले जावे हे प्रमुख उद्दिष्ट समोर होते.ह्या उपक्रमांचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

**उद्दिष्टे:**

1. लातूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.
3. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
4. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमांचा अभ्यास करणे.
5. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रम राबविताना येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहीतके :**

1. लातूर जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही.
2. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविताना मुख्याध्यापक व शिक्षकांना अनेक समस्या जाणवतात.याबाबत मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या मतांमध्ये सार्थ फरक दिसून येत नाही.
3. सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना केल्यास प्राथमिक शिक्षणातील सार्वत्रिकीकरणाच्या उद्दिष्टांची पूर्तता होऊ शकते.

**परिकल्पना:**

लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रम राबविण्यात शाळेच्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांना पायाभूत सोयीसुविधा संदर्भात समस्या भेडसावतात. याबाबत शाळेच्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या मतांमध्ये सार्थ फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

1. प्रस्तुत संशोधनाची भौगोलिक व्याप्ती व मर्यादा लातूर जिल्ह्यातील 10 तालुक्यापुरतीचआहे.
2. प्रस्तुत संशोधन हे केवळ शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या सर्व शिक्षा अभियानाशी संबंधितआहे.
3. प्रस्तुत संशोधनाची कालमर्यादा ही 2009-10 ते 2013-14 पुर्तीच व्यापक व मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**संशोधनाची साधने:**

प्रश्नावली - मुख्याध्यापक व शिक्षक

**जनसंख्या:**

लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यातील एकूण 1676 प्राथमिक शाळा आहेत.या शाळा आणि शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

**नमुना निवड:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने लातूर जिल्ह्यातील 10 तालुक्यातील एकूण 1676 शाळांपैकी 25% शाळा म्हणजेच 420 शाळांची लॉटरी पद्धतीने निवड केली आहे

मुख्याध्यापक 420*1=420

शिक्षक 420*2=840

**संख्याशास्त्रीय साधने:**

प्रस्तुत संशोधनाच्या विश्लेषणासाठी शेकडा प्रमाण हे संख्याशास्त्रीय साधन वापरले आहे.तसेच परिकल्पनांची पडताळणीसाठी काय-स्केवर चाचणीचा वापर केला आहे.

**निष्कर्ष:**

1. लातूर जिल्ह्यातील नमुना प्राथमिक शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात.

2. एकूण प्रतिसादक मुख्याध्यापकांपैकी बहुतांश मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षा अभियानाच्या विविध उपक्रमांत साधारण सहभाग घेतला असल्याचे नमूद केले आहे. तर अंशतः सहभागी असल्याचे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापकांचेप्रमाण नगण्य आहे.

3. लातूर जिल्ह्यातील नमुना शिक्षकापैकी बहुतांश शिक्षक सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये संपूर्णपणे सक्रिय सहभागी आहेत.

4. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील सोयीसुविधांबाबत उद्भवणाऱ्या समस्यांविषयी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या मतांमध्ये सार्थ फरक दिसून येत नाही.

5. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रम राबविण्यासाठी निधी उपलब्धतेबाबत उद्भवणाऱ्या समस्यांविषयी मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या मतांमध्ये सार्थ फरक दिसून येत नाही.

6. लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील सर्वाधिक मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रम राबविल्या जाणाऱ्या समस्यांमध्ये शिक्षक प्रशिक्षणाशी निगडीत वास्तववादी प्रशिक्षणाच्या समस्येची तीव्रता मध्यम असल्याचे मत नोंदवले आहे.तर नमुना शिक्षकांनी देखील सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रम राबविण्यात येणाऱ्या समस्यांमध्ये शिक्षक प्रशिक्षणाशी निगडीत वास्तववादी प्रशिक्षणाच्या समस्येची तीव्रता मध्यम असल्याचे मत नोंदवले आहे.

**शिफारशी :**

1. मुख्याध्यापक व शिक्षकांनी देखील सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेऊन उपक्रम यशस्वी होण्यासाठी अधिकाधिक कार्य करावे.

2. सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये अत्यंत महत्त्वाचा दुवाम्हणजे शिक्षक होय. त्यामुळे शिक्षकांनी सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे.या उपक्रमांच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी प्रयत्न करून उपक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने कार्य करावे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. भिंताडे वि.रा. (1988), शैक्षणिक संशोधन, पुणे,नुतन प्रकाशन
2. मराठे एम. जी.(2004), सवावेशक शिक्षण-सर्व शिक्षण मोहीम : लोकप्रतिनिधींसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका, पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
3. देशपांडे व.सी., पाटील वा.र.(2007), प्राथमिक शिक्षण-सद्य:स्थिती, समस्या व उपाय,पुणे,निराली प्रकाशन
4.इनामदार सुनंदा(1996), प्राथमिक शाळांचे उपक्रम, पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद